Indian Streams Research Journal ORIGINAL ARTICLE ISSN:-2230-7850

# महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षण (विशेष संदर्भ – आंबेगाव तालुका)



विकास विठ्ठल शेवाळे
समाजशास्त्र विभागप्रमुख , कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे ,
डॉ. अरविंद ब. तेलंग वरिश्ठ महाविदयालय, निगडी, पुणे .

**सारांश ः** शिक्षण म्हणजे क्षणा–क्षणाला मिळणारे ज्ञान शिक्षणामुळे आधुनिकीकरणाची दारे खुली होतात असे सर्वत्र मानले जाते. तसेच शिक्षणामुळे विकास प्रकियेत लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन मिळते शिक्षणामुळे नविन कौशल्य आत्मसात केली जातात. त्यामुळे त्यांना नवीन रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतात म्हणूनच शासनाच्या विविध योजना मधील शिक्षण ही एक महत्वाची योजना आहे. स्वातंत्रप्राप्तीनंतर अनुसूचित जमाती मधील सर्वांना शिक्षण घेता यावे, त्यातून त्यांच्यात परिवर्तन घडून येण्यासाठी मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतिगृह, शिश्यवृत्या इ. सोयी – सवलतीची अमलंबजावणी मोठया प्रमाणात राबविण्यात आली तरीही साक्षरते अभावी त्याचा फायदा अनुसूचीत जमातीना झाला नाही ही सद्यस्थिती महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षणातून लक्षात येते.

महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षणाची सद्यस्थिती, स्त्री शिक्षणाचे विश्लेषण जीवनमानातील परिवर्तन, शैक्षणिक परिस्थिती सुधारण्याचा दृष्टिकोन मांडला आहे. त्यातून असे लक्षात येते की या जमातातील स्त्रीयांचा शैक्षणिक विकास पुरूषाच्या तुलनेत कमी आहे, स्त्री शिक्षणाच्या अभामुळे शासकीय योजनेचा लाभ त्यांच्या पर्यंत पोहचला नाही, स्त्रियांचा स्तर पुरूषापेक्षा कनिष्ठ असा आहे. याचाच अर्थ असा कि स्त्री शिक्षणाबाबत कमालीची उदासिनता या जमातीत मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे विविध कल्याणकारी योजनेचा लाभ त्यांना मिळत नाही.

महादेव कोळी जमातीतील स्त्री जीवन म्हणजे कष्टाची मालिका आहे. दिवसभर स्वतःच्या कुंटुबासाठी काम करणे हीच त्यांची दिनचार्या आहे. त्यातून शिक्षणाविषयीची उदासिनता पहावयास मिळते. भारतीय संविधात केलेल्या तरतुदीनुसार त्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत पण पुरूषाच्या तुलनेत स्त्री शिक्षणाचा अभाव असलेला दिसून येतो. शैक्षणिक पातळीचा विचार केल्यास असे लक्षात येते की मुलांपेक्षा मुलींचे शिक्षणाचे प्रमाण बरेच कमी आहे. म्हणजे या जमाती मधील स्त्रियांची शैक्षणिक पातळी निम्न आहे. त्यामुळे पुरूषापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. शाळेतील गळतीचा विचार केल्यास त्याचे प्रमाण मोठे आहे परिक्षेला न बसणे, शाळेत न जाणे असे मोठे अडथळे त्यांच्या शिक्षणात आहेत. तसेच शैक्षणिक सोयी–सवलतीचे ज्ञान त्यांच्या पर्यंत परीपूर्ण पणे पोहचले नाही. शिक्षणाची समान संधी असताना स्त्री शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

स्त्री शिक्षणासाठी आधुनिक भारतीय समाजात आदिवासी स्त्रायांना शिक्षणाचा समान अधिकार आहे. पण स्त्री शिक्षणा विषयी असलेला पारंपारिक दृष्टीकोन, शिक्षणाबाबत असलेली पारंपरिक मनावृत्ती यामध्ये बदल होणे आवश्यक आहे.





### *प्रस्तावना :–*

शिक्षण म्हणजे क्षणा–क्षणाला मिळणारे ज्ञान शिक्षणामुळे आधुनिकीकरणाची दारे खुली होतात असे सर्वत्र मानले जाते. तसेच शिक्षणामुळे विकास प्रक्रियेत लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन मिळते शिक्षणामुळे नविन कौशल्य आत्मसात केली जातात. त्यामुळे त्यांना नवीन रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतात म्हणूनच शासनाच्या विविध योजना मधिल 'शिक्षण' ही अशी योजना आहे की जिच्यामुळे व्यक्तिगत व समुदाय जीवनात अनेक प्रकारचे बदल घडून येतात. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनुसूचित जमातीतील सर्वांना शिक्षण घेणे शक्य व्हावे त्यातून त्यांच्याही जीवनात परिवर्तन घडून येईल यासाठी संविधानात केलेल्या तरतुदीनुसार अनुसूचित जमातीतील मुला–मुलीसाठी मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतिगृह, शिश्यवृत्या, राखीव जागा स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र अशा सोयी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली या सर्व सोयी – सवलतीचा आंबेगाव तालुक्यातील महादेव कोळी जमातीतील स्त्रीयांना किती प्रमाणात फायदा घेतला व त्या अधारे त्यांची शैक्षणिक स्थिती कशी आहे. या संबंधी माहिती प्रस्तुत शोध निबंधात मांडली आहे.

### *अध्ययन क्षेत्र –*

क्षेत्रीयदृष्टया विचार केल्यास महादेव कोळी जमातीचे वास्तव्य महाराष्ट्रातील पुणे, ठाणे, नंदुरबार, धुळे, अमरावती, अकोला या प्रमुख जिल्हयामध्ये आढळते. प्रस्तुत शोध निबंधासाठी पुणे जिल्हातील आंबेगाव तालुका निवडला आहे. पुणे जिल्हयाच्या पश्चिमेस आंबेगाव तालुक्याचा आदिवासी भाग हा भिमाशंकरचा परिसर म्हणून ओळखला जातो. सहयाद्री पर्वतच्या कोप–यात वसलेला असा हा आंबेगाव तालुका त्यातील महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षणाची सद्यः स्थिती याचा अभ्यास या शोध निबंधात विचारात घेतला आहे.

### *उदिष्टये :–*

महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षण या संदर्भात शोध निबंध लिहिण्याचे निश्चित केल्यानंतर शोध निबंधाची काही उदिष्टये ठरविली ती अशी.

1.या जमातीतील स्त्री शिक्षणाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करणे.
2.या जमातीतील स्त्री शिक्षणाचे विश्लेषण करणे.
3.महादेव कोळी स्त्रीयांच्या भवितव्याविषयी व शैक्षणिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टिकोणातून त्यांची मते तपासून पहाणे.

### *गृहीतकृत्य :–*

प्रस्तुत शोधनिबंधासाठी गृहितके पुढील प्रमाणे निवडले.

1.महादेव कोळी जमातीतील स्त्रीयांचा शैक्षणिक विकास पुरूषाच्या तुलनेत कमी आहे.
2.या जमातीतील स्त्री शिक्षणाच्या अभावामुळे शासकीय योजनाचा लाभ त्यांच्या पर्यंत पोहचला नाही.
3.या जमातीतील पुरूषापेक्षा स्त्रियांचा स्तर कनिष्ठ आहे.
4.महादेव कोळी जमातीतील ज्या स्त्रीया शिक्षणाच्या प्रवाहात आल्या अशा स्त्रियांच्या जीवन मानात बदल झालेला आहे.
5.या जमातीतील स्त्री शिक्षणाबाबत कमालीची उदासीनता आहे.

### *शोध निबंधाचे महत्वः–*

प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उददेश पुणे जिल्हातील आंबेगाव तालुक्यातील महादेव कोळी या आदिवासी जमातीतील स्त्री शिक्षणाचा अभ्यास करणे असा आहे. त्यात या जमातीतील स्त्री शिक्षणाच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना, सोयी, सवलती व त्याची जाणिव व त्या विषयीचे ज्ञान व ती सुधारण्याच्या दृष्टीकोनातून त्यांची मते आणि त्यांचा बिगर आदिवासीयांच्या संपर्कामुळे त्यांच्यात जाणवणारे परिणाम इ. बाबी तपासणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे. त्यातून काही निष्कर्ष प्रस्थापित करता येतील तसेच शासन, सेवाभावी संस्था, सर्वसामान्यजनता, अभ्यासक, विचारवंत इत्यादीना त्याचा उपयोग होऊ शकेल म्हणून हा विषय महत्वाचा वाटतो.

### *संशोधन पध्दती :–*

सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाला शास्त्रीय अधार असणे आवश्यक आहे कारण त्यामुळे शोध निबंधाची सत्यता वाढते व ते संशोधन समाजउपयोगी बनते त्यासाठी संशोधन पध्दत्तीचा आवलंब केला जातो सदर शोध निबंधासाठी प्राथमिक व दुयम साधनसामुग्रीचा उपयोग केला आहे. प्राथमिक मध्ये मुलाखत, निरिक्षण यावर भर दिला आहे. तर दुयम सामग्रीमध्ये विविध संदर्भ साहित्य त्यात वर्तमानपत्रे, मासिके व शासकीया व बिगर शासकीय संस्थानी जमा केलेली माहिती याचा आधार घेतला आहे.

***महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षण :–***

महादेव कोळी जमातीतील स्त्री जीवन म्हणजे कष्टांची मालिका आहे. त्यात सकाळी लवकर उठून स्वयंपाक करून जंगलात जावून लाकुड फाटा गोळा करणे नंतर ती मोळी घेवून गावात विकायला जाणे त्यातून आलेल्या पैशातून घरात लागणा–या वस्तू विकत आणायच्या नंतर शेत असल्यास शेतात काम करायचे आणि आल्यावर पुन्हा रात्रीचा स्वयपाक करणे ही अशी दिनचर्या महादेव कोळी जमातीतील स्त्रीयांची आहे. या त्यांच्या कामात त्यांच्या मुली आईला मदत करतात. यातूनच त्यांची शिक्षणा विषयीची उदासिनता प्रामुख्याने पहावयास मिळते.

***शैक्षणिक सुविधा –***

भारतीय संविधानात केलेल्या तरतुदीनुसार अनुसूचित जमातीसाठी मोफत शिक्षण, आश्रमशाळा, वसतिगृह, शिक्षण मार्गदर्शन केंद्र या सुविधा आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात आहेत पण या जमातीतील स्त्रीया सर्व शैक्षणिक सुविधा पासून वंचित आहेत. त्याचे असणारे महत्व साक्षरते अभावी त्यांच्या लक्षात येत नही म्हणजे शैक्षणिक सुविधा असून पुरूषाच्या तुलनेत स्त्री शिक्षणाचा अभाव असलेला दिसून येतो.

***शैक्षणिक पातळी :–***

महादेव कोळी जमातीला दिल्या जाणा–या सेयी सवलतीचा स्त्रीयांनी किती फायदा करून घेतला म्हणजे प्राथमिक स्तरापासून ते पदवी पर्यंत शिक्षण घेणा–या स्त्रीयांचे प्रमाण किती आहे. या बाबत केलेल्या निरिक्षणातून असे लक्षात आले की प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण गावात शाळा असल्या मुळे बरे आहे. पण मुलांच्या प्रमाणापेक्षा मुलीचे शिक्षणाचे प्रमाण बरेच कमी आहे. थोडक्यात कुटुंब प्रमुख अशिक्षित आहेत व जे साक्षर आहेत त्यांचे फक्त प्राथमिक शिक्षण झाले आहे. पुढील शिक्षणा विषयी कमालीची उदासिनता आहे. त्यामुळे या जमातीतील स्त्रीयांची शैक्षणिक पातळी निम्न असल्याचे दिसून येते.

***साक्षरता प्रमाण :–***

महादेव कोळी जमातीतील साक्षरता प्रमाण विचार करायला लावणारे आहे. त्यातील स्त्री साक्षरता विचारात घेतल्यास या जमातीतील स्त्रीयामध्ये शिक्षणाबद्दलची उदासीनता स्पष्ट होते तसेच या जमातीत स्त्री शिक्षणाबद्लची जाणीवजागृती निर्माण झालेली नाही असे दिसते. त्यामुळे पुरुषापेक्षा स्त्री साक्षरतेच प्रमाण कमी पहावयास मिळते. त्यातुन शिक्षणा विषयी या जमातीत स्त्रीयांना दुयम दर्जा आहे असे पहाणीतून लक्षात आले.

***शाळेतील गळती :–***

महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षणाचा विचार करता शाळेतील प्रवेश घेतलेली मुले व मुली कायम स्वरूपी म्हणजे वर्षभर शाळेत येतात का नही या घटाकची माहिती करून घेतल्यावर असे लक्षात आले की मुलींचे गळतीचे प्रमाण मुलांपेक्ष अधिक आहे. तसेच मुलांपेक्षा मुलीचे शाळेतील प्रवेश सुध्दा कमी असल्याचे लक्षात आले म्हणजे मुलांच्या तुलनेत मुलींची प्रवेश संख्या कमी असणे व गळतीचे प्रमाण अधिक असणे ही बाब स्त्री शिक्षणाविषयी उदासीनता स्पष्ट करते. त्यातून असे लक्षात येते की मुलीचे शाळेत जाण्याचे वय असूनही शाळेत न जाणे, परीक्षेला न बसणे अशा स्वरूपाचे स्त्री शिक्षणातील अडथळे लक्षात आले.

***शैक्षणिक सोयी–सवलतीचे ज्ञान :–***

महादेव कोळी जमातीतील लोकांना शैक्षणिक सोयी–सवलतीचे ज्ञान काही प्रमाणात आहे. त्यापासून होणारा फायदा त्यांच्या लक्षात आलेला आहे. पण तरीही मुलगा व मुलगी या मध्ये शिक्षणाच्या बाबतीत भेदभाव होत असल्याचे लक्षात येते. लग्नानंतर मुलगी दुस–याच्या घरी रहायला जणार मग त्याचा आपल्याला काय फायदा अशा प्रकारचा विचार त्यांच्या मनामध्ये मोठया प्रमाणात आहे. म्हणून स्त्री शिक्षणाकडे या जमातीत गांभी–याने पाहीले जात नाही. म्हणजे आज अनेक प्रकारच्या शिक्षणाच्या सोयी सुविधा असूनही ही जमात स्त्री शिक्षणात मागे आहे.

***समान शिक्षण संधी :–***

भारतीय राज्यघटनेने स्त्री–पुरूष समानतेचे तत्व स्वीकारलेले आहे. प्रत्यक्षात समानतेचे तत्व या विषयी जाणीव जागृतीसाठी शासन, सेवाभावी संस्था खूप मोठया प्रमाणात प्रयत्न करतात. त्यातून स्त्रियांसाठी सर्व क्षेत्र खुले केले आहे. तरीही या जमातीमध्ये मुलगा व मुलगी यांना शिक्षणामध्ये समान अशी संधी नाही ही बाब निरिक्षणातून लक्षात येते तसेच मुला–मुलींच्या शिक्षणात भेदभाव करणारी मानसिकता आजही कमी झाली नाही हे मोठया प्रमाणात जानवते.

***समारोप :–***

अशा प्रकारे महादेव कोळी जमातीतील स्त्री शिक्षणाची सद्यस्थिती आपल्याला वरील प्रमाणे थोडक्यात स्पष्ट करता येते त्यावरून असे लक्षात येते अनुसुचित जमातीतील स्त्री शिक्षणासाठी शासनाने ज्या सोयी सवलती उपलब्ध केल्या त्याची परिपूर्ण माहिती महादेव कोळी जमातीतील स्त्रीयांना नाही. त्यामुळे त्यांचा पुर्णतः लाभ घेतला जात नाही. त्यामुळे त्यांचा अपेक्षित विकास घडून येत नाही. म्हणजे स्त्री शिक्षणा विषयी असलेला पारंपारिक दृष्टीकोन, शिक्षणाबाबत असलेली पारंपरिक मनोवृत्ती यामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

***संदर्भ ग्रंथ :–***

1.गारे गोविंद, (1974), सहयाद्रीतील आदिवासी :– महादेव कोळी सहाध्ययन प्रकाशन, मुबंई.
2.गारे गोविंद, (1975), आदिवासी प्रश्न, आदिम प्रकाशन, पुणे.
3.नाडगोंडे गुरूनाथ (1979), भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
4.कुलकर्णी शौनक (2007), संस्कुती आणि जीवनशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे –30.
5.मुनघाटे प्रमोद, (2007), आदिवासी मराठी साहित्य, स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
6.आकरे बी. एन (2009), आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपुर.
7.आगलावे प्रदिप (2000), संशोधन पध्दत्तीशास्त्र व तंत्रे, विद्य प्रकाशन, नागपुर
8.भंडारकर पु. ल. (1987), सामाजिक संशोधन पध्दत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर.
9.नाडगोंडे गुरूनाथ (1999), सामाजिक संशोधन पध्दत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर
10.Sharma K. R. (2002) Research Methodology National Publishing House, Jaipur.